नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २५२ Issue - 252 | वार बुधवार दि. २९ जानेवारी २०२५ Blow- Wednesday Date 29 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यातील स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

### सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी पुढे ढकलली!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने आणि ओबीसी आरक्षणासहित निवडणुका व्हाव्यात की नाही आदी विविध विषयांवर सर्वोच्च न्यायालयात प्रश्न प्रलंबित असताना आजची सुनावणीही संपली आहे. आता या प्रकरणी २५ फेब्रुवारीला पुढची सुनावणी होणार असून यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडल्या आहेत.



याप्रकरणी पालिकेचे वकिल देवदत्त यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली.

ॲड. देवदत्त म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत ओबीसी आरक्षणाच्या निर्णयाला आव्हान आलं आहे. या प्रकरणी सुनावणीला वेळ लागेल. ओबीसीच्या राजकारणातील आरक्षणाचा विषय पूर्णपणे क्लिअर झाला आहे. त्या विषयावर कोणत्याही पक्षात मतभेद नाहीत. सुरुवातीला कोर्टाने ५ फेब्रुवारी तारीख दिली होती. पण त्यादिवशी दिल्लीच्या निवडणुका आहेत, त्यामुळे २५ फेब्रुवारीला आता पुढील सुनावणी होणार आहे.

ओबीसी आरक्षणाठी जो गुंता झाला होता तो सोडवण्यात आला आहे. राज्य सरकारचे वकील तुषार मेहता यांनीही स्पष्ट केलं की आम्हालाही लवकरात लवकर निवडणुका घ्यायच्या आहेत. सर्वोच्च न्यायालयने दोन्ही पक्षांना विचारलं की सुनावणी घेण्याकरता किती वेळ लागेल. आमच्या बाजूने सर्व मुद्दे संकलित झाले आहेत, त्यामुळे अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ लागणार नाही. तर जनरल सॉलिसिटर तुषार मेहता यांनीही सांगितलं की तासाभरापेक्षा जास्त वेळ लागणार नाही, असा संवाद न्यायालयात झाला असल्याचं ॲड. देवदत्त म्हणाले.

#### एप्रिल-मेनंतर निवडणुका?

**आता २५ फेब्रुवारीला निर्णय आला आणि जैसे थे स्थिती उठवली तरच एप्रिल मेपर्यंत निवडणुका होऊ शकतील. पुढच्या सुनावणीवेळी हे प्रकरण लवकर ऐकण्यात येईल, असं आश्वासनही कोर्टाने दिलं असल्याचं ॲड. सिद्धार्थ शिंदे म्हणाले.**

## मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरात ड्रेस कोड लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गणेश भक्तांचं आराध्य दैवत असलेल्या मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरातून महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे. सिद्धिविनायक मंदिर न्यासाकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. आता सिद्धिविनायक मंदिरात ड्रेस कोड लागू करण्यात आला आहे. सिद्धिविनायक मंदिर ट्रस्ट न्यासाकडून ड्रेस कोडबाबत एक अधिकृत पत्र काढण्यात आलं आहे. मंदिरात येणाऱ्या भाविकांनी आता भारतीय पारंपरिक वेषात, अंगभर कपडे घालून मंदिरात येणं आवश्यक असणार आहे. या कपड्यांमध्येच मंदिरात प्रवेश दिला जाईल, अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही, असं न्यासाकडून सांगण्यात आलं आहे. सिद्धिविनायक मंदिरात पुढच्या आठवड्यापासून आचारसंहिता ड्रेस कोडवर ठेवली आहे. मंदिरात येणाऱ्या भक्तांनी शालिनता आणि मंदिराचं पावित्र जपणारा पेहराव करावा. बाप्पाच्या दर्शनासाठी येताना मंदिराचं पावित्र नष्ट होणार नाही अशा प्रकारचा पेहराव भाविकांचा असावा.

**'मंदिराचं पावित्र्य जपणारा पेहराव असावा,' न्यासाकडून महत्त्वाचा निर्णय**

नेमका पेहराव कसा करावा यावर बंधन नाही, मात्र जो पेहराव कराल तो दुसऱ्याला संकोच वाटणारा नसावा. म्हणजेच समोरच्या लोकांना लाजवतील किंवा त्यांना संकोच वाटेल असे कपडे नसावेत. तसंच तोकड्या कपड्यांवर बंदी असणार आहे. महिला, पुरुषांनी शॉर्ट पँट घालू नये. अंगभर कपडे असलेला पेहराव करावा. दरम्यान, काही दिवसांत सिद्धिविनायक मंदिरात माघी गणेश जयंतीचा उत्सव सुरू होईल. त्याआधी एक बैठक पार पडली. या बैठकीत हा महत्तवपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. पुढील आठवड्यापासून समोरच्याला संकोच वाटेल असा पेहराव एखाद्या भाविकाचा असेल तर त्यांना न्यासाकडून प्रवेश दिला जाणार नाही, याची नोंद भाविकांनी घ्यावी, असं न्यासाकडून सांगण्यात आलं आहे.

#### भक्ताचा पेहराव मंदिराचं पावित्र्य जपणारा असावा

**काही भक्तांच्या तक्रारी, सूचना न्यासाकडे प्राप्त झाल्या होत्या. काही भाविकांचे पेहराव समोरच्याला संकोच वाटणारे असायचे, त्यामुळेच ड्रेस कोडबाबत हा निर्णय घेण्यात आला आहे. सिद्धिविनायक मंदिरात येणाऱ्या भक्ताचा पेहराव हा पावित्र्य जपणारा असावा, असं सांगण्यात आलं आहे.**

### थोडक्यात...

#### अटल सेतूवर सध्याच्याच सवलतीच्या दराने आणखी एक वर्षभर पथकर आकारणी

मुंबई : अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवर सध्या सुरू असलेल्या सवलतीच्या दरानेच आणखी एक वर्षभर पथकर आकारणी करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या वापराकरिता यापुर्वी ४ जानेवारी २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत एमएमआरडीएने प्रस्तावित केलेल्या दराच्या ५० टक्के सवलतीच्या दराने पथकर (कमीत कमी २५० रुपये इतका) आकारणीचा निर्णय घेण्यात आला होता. या दराचा एक वर्षानंतर आढावा घेण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. त्यानुसार आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आणखी एक वर्षभर म्हणजेच ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सध्या सुरु असलेल्या सवलतीच्या दरानेच पथकर आकारणीस मान्यता देण्यात आली. मुंबई महानगर विकास प्राधिकरणातर्फे उभारण्यात आलेला हा सुमारे २२ किलोमीटर लांबीचा अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू प्रकल्प १३ जानेवारी २०२४ पासून सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

## इस्रोने श्रीहरीकोटामधून शंभरावे उड्डाण केले यशस्वी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीहरी कोटा : भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजे इस्रोने देशाच्या इतिहासात सोनेरी अक्षराने लिहिता येईल असा आणखी एक अध्याय रचला. उपग्रहांच्या प्रक्षेपणासाठी वापरल्या जाणाऱ्या आंध्र प्रदेशमधील श्रीहरीकोटाहून आज इस्रोच्या रॉकेटने - प्रक्षेपकाने १०० व्यांदा उड्डाण केले. GSLV-F15 या प्रक्षेपकाने छतड-०२ नावाचा दोन २५० किलो वजनाचा उपग्रह हा १७० किलोमीटर उंचीवर अगदी अचूकपणे प्रक्षेपित केला. या तळावरुन उपग्रह प्रक्षेपित करणाऱ्या इस्रोचे हे १०० वे उड्डाण ठरले आहे.



अमेरिकेच्या ऋझड प्रमाणे भारतीय उपखंडात स्वदेशी दिशादर्शक प्रणाली किंवा व्यवस्था कार्यरत व्हावी यासाठी २०११ पासून इस्रोने NavIC ( Navigation with Indian Constellation ) नावाने सात उपग्रह प्रक्षेपित केले आहेत. या उपग्रहांमुळे लष्कराच्या विविध विभागांना आणि नागरी विमान सेवेकरता GPS प्रमाणे दिशादर्शन हे भारतीय उपखंडात केले जाते. याच उपग्रहांच्या प्रणालीत आता NVS-02 हा नवीन उपग्रह २०१६ ला पाठवलेल्या IRNSS-1E या उपग्रहाची जागा घेईल.

१० ऑगस्ट १९७९ ला श्रीहरीकोटा या तळावरुन इस्रोच्या रॉकेटने पहिले उड्डाण केले. त्यावेळी Rohini Technology Payload हा उपग्रह प्रक्षेपित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ते उड्डाण अयशस्वी ठरले असले तरी श्रीहरीकोटावरुन उपग्रह प्रक्षेपणाचा श्रीगणेशा करण्यात आला. त्या मोहिमेचे नेतृत्व हे डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांनी केले होते. मात्र त्यानंतर अपयशाने खचून न जाता १८ जुलै १९८० ला याच तळावरुन भारताने अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वाखाली स्वबळावर पहिला उपग्रह प्रक्षेपित केला. आजच्या १०० व्या उड्डाणासह इस्रोने या श्रीहरीकोटाहून आत्तापर्यंत एकुण ५४८ उपग्रह प्रक्षेपित केले असून यामध्ये ४४३ विदेशातील उपग्रहांचा समावेश आहे. याच तळावरुन आत्तापर्यंच चांद्रयान, मंगळयानसारख्या मोहिमा प्रक्षेपित केल्या आहेत. लवकरच समानवी मोहिम ही याच तळावरुन प्रक्षेपित केली जाणार आहे.


आजच्या य़शाच्या निमित्ताने इस्रोचे अध्यक्ष व्ही नारायण यांनी इस्रोच्या सर्व अभियंता, कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. आजच्या १०० व्या उड्डाणानिमित्त इस्रोचे चार माजी अध्यक्ष हा सोहळा पहाण्यासाठी उपस्थित होते.

## उत्तर प्रदेशातील बागपतमध्ये मोठी दुर्घटना; धार्मिक कार्यक्रमात स्टेज कोसळून ७ जण ठार, ४० जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रयागराज : उत्तर प्रदेशमधील बागपतमध्ये आज (२८ जानेवारी) एक मोठी दुर्घटना घडली आहे. बागपतमध्ये एका धार्मिक कार्यक्रमात स्टेज कोसळून झालेल्या दुर्घटनेत ७ जण ठार झाले आहेत, तर ४० पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. तसेच ५० पेक्षा जास्त भाविक स्टेजखाली दबल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर या ठिकाणी चेंगराचेंगरी सदृष्य परिस्थिती निर्माण झाली होती. या घटनेत जखमी झालेल्या भाविकांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

बागपत येथे मंगळवारी जैन निर्वाण उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवासाठी मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले होते. यावेळी भगवान आदिनाथांच्या निर्वाण लाडू उत्सवात मनस्तंभ संकुलात तात्पुरतं उभारलेलं लाकडी व्यासपीठ अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला तर ४० पेक्षा जास्त जण जखमी झाले. या अचानक घडलेल्या दुर्घटनेनंतर त्या ठिकाणी मोठा गोंधळ उडाला होता. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.



पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भगवान आदिनाथांना लाडू अर्पण करण्यासाठी आज सकाळी शेकडो भाविक या ठिकाणी आले होते. मात्र, अचानक ही दुर्घटना घडली. ही घटना घडल्यानंतर स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केलं. त्यानंतर जखमी झालेल्या भाविकांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तसेच या घटनेची माहिती मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घेतली असून योग्य त्या सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी अस्मिता लाल यांनी या घटनेची माहिती देताना सांगितलं की, बागपतमध्ये हा कार्यक्रम सुमारे ३० वर्षांपासून आयोजित केला जातो. यावेळीही आयोजित करण्यात आला होता. मात्र, अचानक लाकडी व्यासपीठ कोसळल्याने ही घटना घडली. यामध्ये ४० लोक जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तसेच २० जणांना प्राथमिक उपचार दिल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आलं आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. तसेच त्या ठिकाणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आलेला आहे. तसेच रुग्णवाहिका आणि तातडीने उपचारासाठी आरोग्य व्यवस्था देखील उपलब्ध करण्यात आली आहे, असं अस्मिता लाल यांनी सांगितलं आहे.

### आरोग्य विभागाच्या विविध योजनांची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करा अधिकाऱ्यांना निर्देश

## मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडून विविध विभागांचा आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/ (जिमाका) : मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हास्तरीय समन्वय समिती, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समिती, १०८ रुग्णवाहिकांच्या सेवाबाबत, एनटीसीपी समन्वयक समिती, जिल्हास्तरीय दक्षता समिती, कृष्ठरोग शोध मोहिम आणि स्पर्श अभियान सीएस तसेच जिल्हास्तरीय स्थायी लेखा परिक्षण समिती अशा विविध विभागांच्या कामकाजाचा बैठकीद्वारे आढावा घेऊन सर्व संबंधित विभागाने आरोग्य विभागाच्या विविध योजनांची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, डीपीओ भगवान भुसारी, सहायक संचालक आरोग्य सेवा (कृष्ठरोग) डॉ. मोहन शेगर, मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिनाक्षी बनसोडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. आनंद गोडसे, वैदकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्रीमती वैशाली थोरात, जिल्हा लेखा व्यवस्थापक श्रीमती वंदना शिंदे, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



समाजात असलेल्या प्रत्येक संशयित कुष्ठरुग्णांचा शोध पथकामार्फत शोध घेऊन त्याचे निदान निश्चित करणे व निदान झालेल्या कुष्ठरुग्णांना तात्काळ बहुविध औषधोपचार सुरु करण्यासाठी केंद्र शासनाने कुष्ठरोग अभियान सुरु केले आहे. हे अभियान १४ दिवसाचे असणार आहे. या अभियानात राज्यातील २० जिल्ह्यामध्ये सोलापूर जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील या १४ दिवसाच्या अभियानासाठी ३६ लाख ५७ हजार ५९० लोकसंख्येची निवड करण्यात आली असून २७६८ शोधपथके तयार करण्यात आली आहेत. शोध पथकाने शोधलेल्या प्रत्येक संशयीताची तपासणी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून करण्यात येणार आहे. या अभियान दरम्यान तपासणी करण्याकरीता येणाऱ्या पथकाकडून तपासणी करुन घेऊन सहकार्य अरावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी केले आहे.

एचआयव्ही एड्स रुग्ण संख्या, उपचार पध्दत, टीबी तपासणी, औषधोपचार बाबत बैठकीत चर्चा झाली. एचआयव्ही पॉझिटीव्ह रुग्णांना सामाजिक सुरक्षा बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी मार्गदर्शन केले. हाय रिक्स ग्रुप मधील महिलांना घरकुल योजना, संजय गांधी निराधार योजना, बाल संगोपन योजना साठी आवश्यक कागदपत्रांच्या अडचणी सोडविण्यासाठी कॅम्प आयोजित करण्याच्या सूचना यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी दिल्या.

जिल्हास्तरीय स्थायी लेखा परिक्षण बैठकीत लेखा परिक्षणात आढळून आलेल्या आक्षेपांची पूर्तता करुन लवकरात लवकर ऑडिट पॅरे निकाली काढावेत. लेखा परिक्षणात वसुली असेल तर तात्काळ वसुलीबाबतची कार्यवाही पूर्ण करावी, अशा सूचना यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी बैठकीत दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी विविध विभागाच्या अडचणी समजावून घेतल्या. अडचणी तात्काळ दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, याबाबत सर्व विभागांना आश्वस्त केले.

## संपादकीय....

### प्रश्न पुन्हा प्रलंबित

महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने आणि ओबीसी आरक्षणासहित निवडणुका व्हाव्यात की नाही आदी विविध विषयांवर सर्वोच्च न्यायालयात प्रश्न प्रलंबित असताना आजची सुनावणीही संपली आहे. आता या प्रकरणी २५ फेब्रुवारीला पुढची सुनावणी होणार असून यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत ओबीसी आरक्षणाच्या निर्णयाला आव्हान आलं आहे. या प्रकरणी सुनावणीला वेळ लागेल. ओबीसीच्या राजकारणातील आरक्षणाचा विषय पूर्णपणे क्लिअर झाला आहे. त्या विषयावर कोणत्याही पक्षात मतभेद नाहीत. सुरुवातीला कोर्टाने ५ फेब्रुवारी तारीख दिली होती. पण त्यादिवशी दिल्लीच्या निवडणुका आहेत, त्यामुळे २५ फ ेब्रुवारीला आता पुढील सुनावणी होणार आहे. ओबीसी आरक्षणाठी जो गुंता झाला होता तो सोडवण्यात आला आहे. राज्य सरकारचे वकील तुषार मेहता यांनीही स्पष्ट केलं की आम्हालाही लवकरात लवकर निवडणुका घ्यायच्या आहेत. सर्वोच्च न्यायालयने दोन्ही पक्षांना विचारलं की सुनावणी घेण्याकरता किती वेळ लागेल. आमच्या बाजूने सर्व मुद्दे संकलित झाले आहेत, त्यामुळे अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ लागणार नाही. तर जनरल सॉलिसिटर तुषार मेहता यांनीही सांगितलं की तासाभरापेक्षा जास्त वेळ लागणार नाही, असा संवाद न्यायालयात झाला असल्याचं ॲड. देवदत्त म्हणाले. एकंदरीत या निवडणुका आता एप्रिल किंवा मे महिन्यात घेतल्या जाणार आहेत, असे वाटते.

# माघी यात्रा कालावधीत भाविकांच्या आरोग्य व स्वच्छतेला प्राधान्य द्यावे

## माघवारी यात्रा पूर्व आढावा बैठक; प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माघ शुध्द एकादशी शनिवार दि. ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी असून, या यात्रेचा कालावधी ०३ ते १२ फेब्रुवारी असा आहे. या यात्रा कालावधीत श्री. विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात मोठ्या प्रमाणात भाविक येतात. येणाऱ्या भाविकांच्या आरोग्य, स्वछतेला प्राधान्य देवून आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच सर्व विभागांनी सोपविलेल्या कामांची जबाबदारी चोखपणे पार पाडावी अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या .



माघ वारी पुर्व नियोजनाबाबत प्रांत कार्यालय पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.महेश सुडके, मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, न.पाचे अभियंता श्री. पवार, महावितरणचे कार्यकारी अभियंता श्री. भोळे, यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले म्हणाले, यात्रा कालावधीत नगरपालिकेने शुध्द व पुरेशा पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, नदीपात्रातील वाळवंटाची व घाटाची स्वच्छता करावी, ६५ एकर व व नदीपात्रात तात्पुरते शौचालयाचे उभारणीचे नियोजन करावे. ६५ एकरमध्ये भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पुरेसा वीजपुरवठा आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. शहरातील प्रमुख रस्ते अतिक्रमणमुक्त करावेत. आरोग्य विभागाने यात्रा कालावधीत पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवावा. नदी पात्रात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध राहील याबाबत पाटबंधारे विभागाने नियोजन करावे. मंदिरालगत विक्रीसाठी बसणाऱ्या पथविक्रेत्यांवर मंदिर, पोलीस प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी. अन्न व औषध प्रशासन विभागाने खाद्यपदार्थ्यांच्या दुकानांची तपासणी करण्यासाठी पथके नेमावीत अशा सूचनाही प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

मंदीर समितीच्या वतीने पत्रा शेड, दर्शन रांग, दर्शन मंडप या ठिकाणी पिण्याचे पाणी, शौचालये, विश्रांती कक्ष, लाईव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच दि. ७ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत दर्शन रांगेतील भाविकांना मोफत चहा, नाष्टा व भोजन व्यवस्था करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

यात्रा कालावधीत वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी तसेच भाविकांना सुरक्षेबाबत कोणतेही अडचण येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन केले असल्याचे उपविभागीय अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी सांगितले.यावेळी नगरपालिका प्रशासनाकडून वारी कालावधीत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा, स्वच्छता, तात्पुरते शौचालय, कचरा व्यवस्थापन, जंतनाशक फवारणी आदी बाबबतची माहिती मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांनी दिली.

यावेळी अन्न-औषध प्रशासन, परिवहन, महावितरण, आरोग्य आदी विभागांचा आढावा घेण्यात आला.

## पुरंदर तालुका रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या अध्यक्षपदी कालीदास उबाळे तरं कार्याध्यक्षपदी सुधीर शेलार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडच्या तालुका अध्यक्षपदी कालीदास उबाळे तरं कार्याध्यक्षपदी सुधीर शेलार यांची नियुक्ती करण्यात आली .

रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष डॉ सतीश केदारी यांनी त्यांना नियुक्ती पत्र दिले, यावेळी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, पुणे शहर अध्यक्ष, किशोर पंडागळे, पश्चिम महाराष्ट्राचे रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेड पारधी आघाडीचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार, पुणे जिल्हा रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे जिल्हा कार्याध्यक्ष, नामदेव नेटके, पुणे शहर सचिव सिध्दार्थ म्हस्के हे यावेळी उपस्थित होते, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस , रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सचिव गोविंद जगताप, यांच्या सुचनेनुसार प्रदेश अध्यक्ष डॉ सतीश केदारी यांनी उबाळे व शेलार यांना नियुक्ती पत्र दिले,

कालीदास उबाळे यांनी यापूर्वी विविध सामाजिक संघटनेत काम केले असून, पुरंदर तालुक्यात त्यांचा दाडंडा संपर्क असून ते जेजुरी येथील रहिवासी आहेत, तरं रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या तालुका कार्याध्यक्षपदी नियुक्ती झालेले, सुधीर शेलार हे गराडे येथील रहिवासी असून, ते पदवीधर आहेत, प्रशासकीय कामाचा त्यांना दाडंगा संपर्क आहे, निवडीनंतर कालीदास उबाळे व सुधीर शेलार





यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदासजी आठवले प्रदेश अध्यक्ष डॉ सतीश केदारी, प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले प्रदेश सचिव गोविंद जगताप जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस यांच्या मार्गदर्शनाखाली सोशीत वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी काम करु अशी प्रतिक्रिया दिली,

## मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी घेतली भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा मतदार संघाचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मस्साजोग जि.बीड येथे जावून स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेत त्यांच्या व्यथा ऐकून घेतल्यां यावेळी स्व.संतोष देशमुख यांच्या अमानवी हत्येप्रकरणातील सर्व दोषींना कडक शिक्षा व्हावी अशी राज्य सरकारकडे मागणी केली. संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी म्हणून आम्ही सर्वजण प्रयत्न करत आहोत आणि त्यांना न्याय मिळेपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा करत राहू, अशा शब्दांत देशमुख कुटुंबियांना आश्वस्त केलं. यावेळी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## स्वेरीत ‘राष्ट्रीय मतदार दिन’ संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : महाराष्ट्र शासन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निर्देशानुसार गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट मध्ये ’राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शुक्रवार,दि. २४ जानेवारी२०२५ रोजी विद्यार्थ्यांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ देण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.



भारत देश हा युवकांचा देश असून १८ वर्षे पूर्ण झालेल्या वयोगटातील तरुण युवकांना नवचेतना देऊन राष्ट्राच्या विकासाच्या दिशेने घेऊन जाणे हा या उपक्रमाचा हेतू आहे. नव तरुणांना राष्ट्र उभारणीच्या कार्याचा एक भाग म्हणून मतदान करण्याबाबत जागृत करण्यासाठी त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे यासाठीस्वेरीमध्ये हा मतदारजनजागृतीचा उपक्रम घेण्यात आला. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली,स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने,डिप्लोमाचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ वइंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली,विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. डी.एस.चौधरी,डॉ. एम.एम.आवताडे ,प्रा. ए. बी.चौंडे यांच्या सहकार्यानेराष्ट्रीय मतदार दिनानिमित्त हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ देण्यात आली. शपथेचे वाचन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. बी.चौंडे यांनी केले. यावेळी रासेयोचे अधिकारी प्रा. एन.एस. शिंदे,प्रा. ए.जी.इंगळे,प्रा. ए.एम. थोरात यांच्यासह इतर प्राध्यापकव विद्यार्थीउपस्थित होते.

## दहावी-बारावीच्या परीक्षार्थ्यांच्या हॉल तिकीट वरील जातप्रवर्गाचा उल्लेख अखेर रद्द; राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाकडून निर्णयाचे स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव/सुधाकर रणदिवे : दहावी, बारावीच्या परीक्षांच्या हॉलतिकिटांवरही विद्यार्थ्यांच्या जातीचा उल्लेख करण्याच्या राज्य शिक्षण मंडळाच्या निर्णयावर टीका झाल्यानंतर हा निर्णय रद्द करण्यात येणार आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या भल्यासाठीच घेतला होता. मात्र, त्याविरोधात असलेल्या लोकभावनेचा आदर करत, तो मागे घेत असल्याचे स्पष्टीकरण राज्य शिक्षण मंडळातर्फे देण्यात आले.राज्य शिक्षण मंडळाच्या ११ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या बारावीच्या परीक्षेच्या हॉलतिकिटांचे वितरण सुरू झाले. त्यावर जातीचा रकाना चढल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. त्यातच अनेक विद्यार्थ्यांच्या जातीची नोंद चुकीची असल्याने या विद्यार्थ्यांसह पालकांचा ताणही वाढला होता.अनेकदा शाळेत प्रवेश घेताना जातीची चुकीची नोंद झालेली असते. पुढील शिक्षणात विशिष्ट प्रवर्गातून प्रवेश घ्यायचा असेल, तर जातीची योग्य नोंदणी आवश्यक असते. पालकांना परीक्षेआधीच शाळेत नोंद झालेली जात कळावी, त्यात काही सुधारणा असल्यास त्या तातडीने करून शाळेकडून शाळा सोडल्याचा दाखला घेतानाच त्यावर सुधारित जात यावी, या उद्देशाने राज्य शिक्षण मंडळाने हॉलतिकिटावर जातीचा रकाना टाकला होता.या निर्णयाला समाजातील विविध स्तरांमधून टोकाचा विरोध झाला. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने ही या निर्णयावर आक्षेप घेत निवेदन देण्यात आले होते.. हॉलतिकिटाचा कागद फक्त त्या परीक्षेपुरता मर्यादित असल्याने त्यावर जातीचा उल्लेख कशाला हवा, असा मतप्रवाह होता. त्याचबरोबर एकीकडे विद्यार्थ्यांना जातीभेद करू नका, अशी शिकवण देताना दुसऱ्या बाजूला परीक्षा प्रवेशपत्रावरच त्यांच्या जातीचा उल्लेख करून त्यांना त्याची जाणीव करून देण्याची गरज नसल्याचेही मत पालक आणि शिक्षणतज्ज्ञही व्यक्त करत होते. या गोष्टींची दखल घेत आता राज्य शिक्षण मंडळाने हा निर्णय रद्द करत असल्याची माहिती दिली. याबाबतचे प्रकटन प्रसिद्ध केल्याचे राज्य शिक्षण मंडळाचे संचालक शरद गोसावी यांनी सांगितले.या निर्णयाचे राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, राज्य सरचिटणीस संतोष भोजणे,राज्य प्रसिद्धी प्रमुख लहू राक्षे,श्रीराम पळसकर,नागनाथ राजुरे,मनोहर राठोड आदी पदाधिकाऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे..

### भारतीय संविधानाचा ७६ वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात

### डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रतिपादन

# संपूर्ण जगाला मार्गदर्शन करणारे भारताचे संविधान आहे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनीधी : भारतीय संविधानाने या देशातील जनतेला स्वातंत्र्य समता बंधुभाव न्याय मिळवून दिला. संविधान हे सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष व लोकशाही गणराज्य असून सर्वांना न्याय व दर्जाची समान संधी उपलब्ध करून देते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या तब्येतीची काळजी न करता मोठ्या कष्टाने भारताचे संविधान लिहिले. जगातील अनेक देशाच्या राज्यघटना बदलण्यात आल्या परंतु भारताच्या संविधानाने ७५ वर्षात १४० कोटी जनतेला एकत्रितपणे बांधून ठेवले याचे सर्व श्रेय डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या राज्यघटनेचे आहे. भारताचे संविधान हे जगातील सर्व देशाला दिशादर्शक व मार्गदर्शन करणारे असल्याचे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू अर्थतज्ञ डॉ नरेंद्र जाधव यांनी बोलताना व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे आयोजित भारतीय संविधानाचा ७६ वा वर्धापन दिन सोहळा दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी बालगंधर्व,रंगमंदिर पुणे येथे आयोजित करण्यात आला.

भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान या विषयावर डॉ नरेंद्र जाधव यांनी आपले मौलिक विचार व्यक्त केले. तसेच त्यांनी संविधान निर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान याविषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

बार्टीचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या नेतृत्वाखाली बार्टी चांगले काम करत असल्याचे सांगून मा महासंचालक यांचे अभिनंदन केले.

अध्यक्षस्थानी समाजकल्याणचे माजी आयुक्त श्री मधुकर गायकवाड हे होते. बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, आदी उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करतांना मा महासंचालक श्री वारे म्हणाले की राज्याचे सामाजिक न्यायमंत्री मा श्री संजय शिरसाट, राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ, सचिव डॉ हर्षदिप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली. आपण डॉ बाबासाहेबाच्या मार्गाने जात असुन बार्टीच्या वतीने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व संशोधन क्षेत्रात शिष्यवृत्ती दिला जात असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी बार्टी कटिबद्ध असून तुमचे यश हे समाजाचे, बार्टीचे, संविधानाचे असल्याचे मत व्यक्त करुन यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



बार्टीतील यूपीएससी उत्तीर्ण व्यंकट गायकवाड (उझक्र ) अजय विद्यार्थी प्रियंका मोहिते( खझड) इटकर (उझक्र) यांचा सन्मान डॉ जाधव , श्री वारे यांच्या हस्ते करण्यात आला. शाहिर संदेश विठ्ठल उमाप यांनी जागर संविधानाचा हा प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केला . या कार्यक्रमाला शालेय, स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थी, विविध क्षेत्रातील मान्यवर बार्टीतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले यांनी केले. सुत्रसंचलन प्रकल्प व्यवस्थापक श्री सुमेध थोरात यांनी केले. आभार निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार यांनी मानले.. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरिन तांबोळी व प्रकाशन व प्रसिद्धी विभागाने मेहनत घेतली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### आसरा चौकात अपघात; एकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) इलेक्ट्रिक म ोटरसायकल वरून फिर्यादी विनायक प्रभाकर सराटे (वय-२४,मु.पो.कामती) हा जात




असताना तेव्हा लक्ष्मण भोजप्पा गुळेद (वय-६६-,रा. जुना संतोष नगर,बाळे) यांनी त्यांच्या ताब्यातील कार क्रमांक एम एच.१३.सीके.०१६५ ही रस्त्याचा अंदाज न घेता व कोणताही इशारा न देता अचानकपणे कार वळवून फिर्यादी याच्या दुचाकीला धडक देऊन नुकसान केले. तसेच स्वतःच्या कारच्या मागच्या दरवाजाचे नुकसान होण्यास कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.ही घटना २३ जानेवारी रोजी दुपारी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान घडली.विनायक सराटे याच्या फिर्यादीवरून लक्ष्मण गुळेद याच्याविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार फ ुलारी हे करीत आहेत.

# अपयश न मानता स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रयत्न करा : अभिनेता संजय नार्वेकर

## नांदुर्डी जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अभिनेता संजय नार्वेकर यांचे समवेत साजरा केला हंगामा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील नांदुर्डि जनता विद्यालयात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सांस्कृतिक म होत्सव डॉ. संजयआहेर यांच्या खास प्रयत्नाने मराठी व हिंदी चित्रपट अभिनेते संजय नार्वेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला, मराठी अभिनेते संजय नार्वेकर व मविप्र समाज संस्था उपाध्यक्ष विश्वास बापूराव मोरे, मविप्र सभापती बाळास-ाहेब क्षीरसागर महिला संचलिका शोभाताई बोरस्ते ,निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख,सर्व स्कूल कमिटी अध्यक्ष एकनाथ निकम, रामदास बोराडे ,सीताराम . ढोमसे, यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक म्हसकर बी डी यांनी केले यावेळी मराठी अभिनेते संजय नार्वेकर यांनी विद्यार्थी व शिक्षक यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी अपयश न मानता स्पर्धेत टिकून राहण्यासाठी काय करावे या बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्यक्त करून आपल्या जीवन प्रवास सांगताना अगदी साधा माणूस चे एक उत्कृष्ट चित्रपट अभिनेता बनण्यासाठी केलेले संघर्ष याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी शिक्षकांविषयी आदरभाव व्यक्त केली , संस्थेचे उपाध्यक्ष विश्वास बापू मोरे व सभापती बाळासाहेब आप्पा क्षीरसागर यांनी आपले मनोगत व्यक्त करून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हसकर बी डी व पर्यवेक्षक दाते आर पी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या, या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक महोत्सव हंगामा २०२५ अभिनव बाल विकास मंदिर व जनता विद्यालय व जुनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयात सांस्कृतिक महोत्सव यशस्वीपणे पार पाडला यावेळी विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारच्या समूह नृत्यामध्ये भाग घेऊन आलेल्या प्रमुख म ान्यवर संजय नार्वेकर संस्थेतील विविध पदाधिकारी पंचक्रोशीतील मान्यवर व विद्यार्थी पालकांची मने जिंकून घेतली, यावेळी विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकम एस डी, गांगुर्डे मॅडम व शिंदे डी पी मॅडम यांनी केले

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात प्रजासत्ताक दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्य व उच्च माध्यमिक मराठी,कन्नड व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय, गिरीजाम ाता मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय ,वीर शिरीष कुमार बाल संस्कार केंद्र, यशवंराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र, नालंदा विदयार्थी वसतीगृह या सर्व शाखेच्या वतीने प्रजासत्ताक दिन कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात म ोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक मा श्री मुकुंद पत्की यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते यावेळी संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी,सचिव भिमराव साठे,संचालक मल्लिनाथ मसुती,सीइओ सौ रूपाली शहा, जुनीयर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंड, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी,सेवानिवृत्त मुख्याध्यापक बापुजी निंबाळकर, सेवानिवृत्त पर्यवेक्षक शिवानंद पुजारी हे उपस्थित होते. यावेळी आनंदी वातावरणात बँड च्या तालावर विद्यार्थ्यांनी सुंदर संचलन केले, देशभक्तीपर समुहगीत, प्रतिज्ञा तसेच संविधानावर आधारित अनेक विद्यार्थ्यांनी भाषणे केली. यानंतर प्रमुख अतिथी संचालक मुकुंद पत्की यांनी विद्यार्थ्यांना म ार्गदर्शन करून यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शालेयस्तरावर मतदार



जनजागृती निमित्त देशभक्ती थीम वर आयोजित केलेल्या विविध स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्राथमिक चे मुख्याध्यापक सुरेश आवटे, पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे, श्रीदेवी मायनाळे, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप, वायसीएमचे सम न्वयक शरणय्या मसुती, सर्व शिक्षक, कर्मचारी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन कल्पना स्वामी व मनगुळी यांनी सर्वांचे आभार मानले.

# निफाड उपविभागात विविध ठिकाणी विद्युत सुरक्षा जनजागृती मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्ताने निफाड उपविभागात विविध गावांमध्ये महाविद्यालयांमध्ये विद्युत सुर-क्षा संदर्भात जनजागृती मोहीम महावितरण कंपनीच्या वतीने करण्यात आली.



नाशिक परिमंडळाचे प्रभारी मुख्य अभियंता पडळकर,विद्युत निरीक्षक उगले, गोसावी , कार्यकारी अभियंता काळू माळी , यांच्या संकल्पनेतून उपकार्यकारी अभियंता निफाड, निलेश जी नागरे यांच्या मार्गदर्शनानुसार निफाड उपविभागात नांदूर मध्यमेश्वर, रसल-पुर, कोठुरे, रामाचे पिंपळस, कुंदेवाडी, उगाव, कसबे सुकेने येथे गावात तसेच विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रजासत्ताक दिनाचेऔचित्य साधून समस्त वीज ग्राहकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षा संदर्भामध्ये जनजागृती करण्यात आली. विजेचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज असून विजेच्या संदर्भामध्ये स्वतःची सुरक्षितता याला पहिले प्राधान्य दिले पाहिजे वीज बिल भरणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य असून वीज बिल नियमित बरा व महावितरणाला सहकार्य करा अशा महत्वाच्या सुचना करण्यात आल्या.

यावेळी निफाड उपविभागातील शाखा अभियंता बोरसे, सवई, जाधव, पाटील, भगत तसेच जनमित्र आव्हाड, पखाने, हांडगे , कुमावत, धुळे, आ-हेर गोसावी सांगळे, काळे, दिघे, मणियार, मोगल, घुगे, बोराडे, कांगणे अशा सर्वांनीच जनजागृती मोहिमेमध्ये सहभाग घेतला. असुन उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे स्वतः कोठूरे या गावांमध्ये जाऊन त्यांनी विद्युत सुरक्षा तसेच महावितरण कंपनीच्या विविध योजना प्रधानमंत्री सूर्य घर योजना, पिडी असणाऱ्या ग्राहकांसाठीची अभय योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना तसेच आपले थकीत असलेले विज बिल भरण्याबाबत समस्त ग्राहकांम ध्ये जनजागृती केली.

समस्त वीज ग्राहक तसेच विद्या-र्थी व त्यांचे पालक, तसेच शिक्षकवृंद यांनी उत्स्फूर्तपणे कार्यक्रमाला प्रतिसाद दिला...

# भारतीय प्रजासत्ताकाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७६ व्या प्रजासत्ताक दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा प्रतिनिधी/शिव-हार गालफाडे : उस्माननगर येथे भारतीय प्रजासत्ताकाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७६ व्या प्रजासत्ताक दिनी राष्ट्रध्वज फडकवून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते अमिनशहा यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. यावेळी संविधान प्रस्ताविकेचे वाचन करून संविधानाची शपथ घेण्यात आली. संविधान गौरवार्थ जयघोष करण्यात आला आणि संविधान जागर अभियानांतर्गत संविधानाचे महत्त्व पटवून देणाऱ्या पत्रकाचे वाटप शिवाजी बहुजन हिताय बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, उस्माननगर ता. कंधार जि. नांदेड या संस्थेच्या वतीने करण्यात आले. प्रजासत्ताक दिनाच्या उत्सवामध्ये संविधानाचे महत्त्व पटवून देणाऱ्या पत्रक वाटपामुळे उपस्थितांनी या नवअभियानाचे अभिनंदन केले. गावच्या सरपंच सौ. शोभाबाई शेषराव काळम, उस्मान नगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गाडेकर साहेब, माजी पं.स. सभापती प्रतिनिधी दत्ता घोरबांड, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन संजय वारकड, ग्रामपंचायत सदस्य सर्वश्री गोविंद पोटजळे, अंगुलीकुमार सोनसळे, शिवशंकर काळे, बालाजी पाटील घोरबाड, गंगाधर भिसे, महमद शरीफ ग्राम सेविका शिंदे मॅडम, शिव-



ाहर महाराज, अश-ोक काळम, बालाजी इसादकर, मनोहर पांचाळ, अफसर भाई, अहमदखान पठाण, कल्याण सोनसळे, भरत एडते, परसराम भिसे, एकनाथ भिसे, चांदू भिसे, वसंत भिसे सह शहरातील सर्व शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पत्रकार, संविधान प्रेमी नागरिक यांनी उपस्थित राहून मोठा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, संस्थेचे पदाधिकारी गोविंदराव भिसे, उपाध्यक्ष तथा ग्रा.प. सदस्या सौ. संगीता विजय भिसे, अँड. नागण गुरुजी, सखाराम भिसे, रवी सोनटक्के, विशाल भिसे आदींनी सहकार्य केले. या कार्यक्रमाची भूमिका प्रा. विजय भिसे यांनी सांगितली तर आभार तेजस भिसे मानले.

# लोकनेते शंकराव बाळाजी वाजे विद्यालयाच्या प्राथमिक गटातील उपकरणाची राज्यस्तरावर निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : नुकत्याच झालेल्या ५२ व्या जिल्ह-ास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयाने प्राथमिक गटातील 'विघटनशील प्लास्टिक या विज्ञान उपकरणाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. दिनांक २८ जा-नेवारी ते १ फेब्रुवारी २०२५ रोजी अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी या उपकरणाची निवड झाली आहे .इयत्ता आठवीच्या हर्षवर्धन पाटील व स्वर्णीम महाले या विद्यार्थ्यांनी बनविलेल्या या उपकरणाला जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळाल्यामुळे मविप्रचे तालुका संचालक कृष्णाजी भगत यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या. प्रसंगी या उपकरणासाठी मार्गदर्शन करणारे माधुरी बर्वे, संजय कुटे, कीर्ती जाधव, निशिगंधा सोनवणे, महेंद्र आढाव, मनीषा पवार, शितल तळेकर, प्रीती पवार, प्रयोगशाळा सहाय्यक राजाराम सोनवणे यांचाही सत्कार करण्यात आला. प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख, अशोक निंबाळकर, राम ढोली आदींसह विज्ञान शिक्षक उपस्थित होते.

जितेंद्र शिंदे यांनी सूत्रसंचालन केले तर यशवंत दाणी यांनी आभार मानले.

**घरकुल लाभार्थ्यांच्या शेवटचे २५००० हजार रुपयेचे हप्ता ही त्वरित जमा करण्याची मागणी**

# रमाई घरकुल साठी आमदार कल्याणशेट्टी यांना रिपाईचे निवेदन, मुख्याधिकारी यांना तत्काळ कॉल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट नगरपरिषद हद्दीतील भिमनगर व इतर वस्तीतील रमाई घरकुल आ-वास योजनेतिल घरकुल लाभार्थी कर पावतीवर भोगवटदार असल्यामुळे अनेका घरकुल लाभार्थ्यांचे घरकुल पेंडिंग ठेवण्यात आले आहेत. यामुळे अनेक रमाई आवास योजनेतील घरकुल लाभार्थी वंचित आहेत त्या लाभार्थीचे घरकुल फाईल पेंडिंग न ठेवता रिपाई ता अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी घरकुल लाभार्थी सहित अक्कलकोट रिपाई शिस्टमंडळ यांनी भेट घेतले असता या बाबतीत अक्कलकोटचे लोकप्रिय आमदार सचिन (दादा) कल्याणशेट्टी यांच्याकडे दिलेले निवेदानद्वारे तक्रारची तात्काळ दखल घेत अक्कलकोट नगरपरिषदचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांना फोनद्वारे निवेदनाचे दखल घेऊन संबंधित तत्कालीन मुख्याधिकारी असताना त्या वेळेस घरपट्टी (कर टॅक्स पावती) भोगवटदार असताना देखील अनेक घरकुल मंजूर करून बिल अदा करण्यात आले होते, त्या अनुशांगाने संबंधित घरकुल लाभार्थ्यांचे तात्काळ घरकुल मंजूर करून त्याचे खात्यावर बिल अदा करण्यात यावे व अनेक घरकुल लाभार्थ्यांच्या शेवटच २५००० हजार रुपयेचे हप्ता ही त्वरित जमा करण्यात यावे असे सूचना फोनद्वारे करण्यात आले.

यावेळी रिपाई ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे, दत्ता मामा मडीखांबे, विजयकुमार बाळशंकर, श्रीकृष्णा सुतार, बाळासाहेब मडीखांबे, नितेश मडीखांबे, विजय मडीखांबे, रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, जिल्हा युवक सरचिटणीस विजय पोतेनवरू, ता सरचिटणीस राजु भगळे, ता कोषध्यध्यक्ष अंबादास गायकवाड, अंदेवाडी सरपंच रमेश धोडमनी,दुधानी शहर अध्यक्ष




गोरकनाथ धोडमनी,यामनप्पा शिंदे, दुधनीचे,निंगराज नींबाळ भोसगाचे म ालकन्ना सोनकांबळे, व आदी उपस्थित होते.

# शिवसेना प्रभाग क्रमांक १२३ डॉ.सुबोध बावदाने यांच्याकडून धर्मवीर आनंद दिघे यांच्या जयंती निमित्त अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : शिवसेना प्रभाग क्रमांक १२३ मधील शिवसेना शाखेमध्ये शिवसेना घाटकोपर पश्चिम विधानसभा प्रम ुख डॉ.सुबोध बावद-ाने आणि शिवसेना प्रभाग क्रमांक १२३ चे सर्व पदाधिकारी-कार्यकर्ते यांच्याकडून धर्मवीर आनंद दिघे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून नतमस्तक होऊन अभिवादन करण्यात आले.यावेळी शिवसेना





शाखाप्रमुख सुनिल सोडा, महिला शाखाप्रमुख सौ.पूजा पवार व अन्य महिला - पुरुष पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार्तिकी यात्रेप्रमाणे माघ वारीचे नियोजन : गहिनीनाथ महाराज औसेकर

## स्थानिकांसाठी दर्शन व्यवस्था; श्रींच्या विवाह सोहळ्याची जय्यत तयारी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दि. ०२ ते १२ फेब्रुवारी दरम्यान माघ वारी संपन्न होत असून, दि.८ फेब्रुवारी रोजी यात्रेचा मुख्य विषय आहे. या यात्रेला येणा-या भाविकांना कार्तिकी यात्रेप्रमाणे सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आ-हेत. तसेच माघ शुध्द ५ म्हणजे दि.२ फेब्रुवारी रोजी परंपरेनुसार श्रींचा विवाह सोहळा संपन्न होणार आहे. त्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. तसेच स्थानिक नागरिकांच्या दर्शन व्यवस्थेमध्ये वेळ वाढविण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

माघवारी पुर्व नियोजनाबाबत आज श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, पंढरपूर येथे सह अध्यक्ष गहिनीनाथ म हाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली . बैठकीस मंदिर समितीचे सदस्य डॉ.दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, भागवतभुषण अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच पुरातत्व खात्याचे सहायक संचालक डॉ.विलास वाहणे, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, जतन व संवर्धन कामाचे ठेकेदार रमेश येवले तसेच मंदिर समितीचे विविध खात्याचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

कार्तिकी यात्रेप्रमाणे माघ वारी-चे नियोजन करण्यात येणार असून, भाविकांना पत्रा शेड, दर्शन रांग, दर्शन मंडप याठिकाणी मुबलक सोयी -सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच भाविकांच जलद व सुकर दर्शन व्हावे यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. तसेच दि.२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या विवाह सोहळ्याची तयारी व नियोजन तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन संवर्धन कामाचा आढावा घेण्यात आला. त्याचबरोबर स्थानिकांसाठी स.६.०० ते ७.०० व रा.१०.०० ते १०.३० या वेळेत दर्शन व्यवस्था करणे, मंदिरातील सर्व लाकडी दरवाज्यांना मंदिर निधीतून किंवा देणगीदार भाविकांमार्फत चांदी ला-वणे, पालखी महामार्गावर कमान बसविणे, दर्शनरांगेत मृत्यू झालेल्या भाविकांच्या वारसांना १ लक्ष रूपयांची मदत, वयोवृध्द, विकलांग, गरोदर महिला इत्यादी भाविकांना सभामंडपातून प्राधान्याने दर्शन व्यवस्था इत्यादी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

**अडीचशे वर्षाच्या परंपरेची माघवारी**

सद्गुरु वीरनाथ मल्लनाथ महार-ाज यांच्या पालखीचे पायी दिंडीसह गुरुवारी ३० जानेवारीला प्रस्थान

श्री सच्चितानंद सद्गुरु श्री वीरनाथ मल्लनाथ महाराज संस्थान श्रीक्षेत्र औसा यांच्या पावनपरंपरेची माघ पायी वारी दिंडी पालखी सोहळा हजारो शिष्य वारकऱ्यांच्या सहभागासह ज्ञानोबा तुकोबा, विठ्ठल व सद्गुरु नामाचा जयघोष करीत गुरुवार दिनांक ३० जानेवारी २५ रोजी सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिर श्री क्षेत्र गोप-ाळपूर औसा येथून निघून नाथ मंदिर गांधी चौक जुन्या बोरफळ रस्त्याने पादुका मंदिर मार्गे बोरफळ गावी पहिल्या दिवशी मुक्कामाला प्रस्थान ठेवेल.

नाथ संस्थानचे पाचवे पिठाधिपती सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्यात आणि सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या नियोजन मार्गदर्शनात माग पायी वारी दिंडी सोहळा विठू नामाच्या गजरात रवाना होईल पहिला मुक्काम बोरफळ असून ३१ जानेवारी दुपार विश्रांती बेलकुंड तर रात्र मुक्काम उजनी येथे ज्ञानेश्वर मंदिर येथे राहील.

१ फेब्रुवारी रोजी उजनी हून पा-लखीचे पहाटे प्रस्थान होईल. पा-लखी धूत्ता पाटी मार्गे नांदुर्गी येथे न्याहारीसाठी थांबेल व दुपार विश्रांती उंबरे गव्हाण येथे करून रात्र मुक्काम ासाठी केशेगाव तालुका धाराशिव येथे पालखीचे आगमन होईल.

२ फेब्रुवारी रोजी धारूर दुपार विश्रांती घेऊन दिंडी आई तुळजाभवानी मंदिरात दुपारी दोन वाजता पोहोचेल तेथे आई जगदंबेचा अभंग सेवा व दर्शन आटोपून घाटशिळ मार्गे रात्र मुक्कामासाठी पालखी दिंडी आळजा-पूरला थांबेल.

३ फेब्रुवारी रोजी आळजापूर मिर्झापूर मार्गे कासारी दुपारी विश्रांती करिता व नंतर काटी गावाहून दिंडी रात्र मुक्कामासाठी शेळगाव ला पो-होचेल.

४ फेब्रुवारी रोजी पहाटे शेळगावहून कळमन मार्गे मसले चौधरीला दुपार विश्रांतीसाठी थांबून नंतर नरखेड येथे रात्रीचा मुक्काम पा-लखीचा असेल.

५ फेब्रुवारी रोजी दुपार विश्रांती मलिकपेठ तर रात्र मुक्कामासाठी तात्याबाचे चारोळी या गावी पालखी दिंडीचा मुक्काम राहील.

६ फेब्रुवारी रोजी दुपार विश्रांती तुंगत तर रात्र मुक्कामासाठी पा-लखी दिंडी हजारो भाविकांच्या सह चंद्रभागेच्या येलं तीरी थांबेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी पालखी हजारो वारकरी टाळकरी विणेकरी व भक्तांच्या सहभागात विठ्ठल नामाच्या नामघोष-ात पैलतीरी चंद्रभागेच्या वाळवंटात औसेकर महाराजांच्या फडावर पो-होचेल. तिथे पालखीचे जंगी स्वागत वाळवंटातील खेळ खेळीया आरती होऊन पुढे सलग चार दिवस वाळवंटी नामसंकीर्तनाचा जल्लोष चालेल.

दशमी एकादशी द्वादशी सलग तीन दिवस हरिकीर्तनात सात फेब्रुवारीला सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे तर ८ फेब्रुवारी माघ एकादशी दिनी गुरुवर्य श्री चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांचे कीर्तन होईल द्वाद-शी दिनी सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांची कीर्तन सेवा आणि खिरापत सोहळा होईल.

त्रयोदशी दिनी श्री विठ्ठल मंदिरात श्री गुरुबाबा महाराज यांचे प्रासादिक चक्रीभजन मग शुद्धतृयोदशी सोमवार दिनांक १० फेब्रुवारी रोजी पूर्वपरंपरेप्रमाणे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर प्रासादात सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांचे प्रासादिक चक्रीभजनाची सेवा विठ्ठल रुक्मिणी समोर दुपारी तीन ते पाच या दरम्यान रुजू होईल कोणतेही शासन प्रशासन असेल पण अनंत काळापासून औसेकर महाराजांना प्रासादिक चक्रीभजन विठ्ठल मंदिरात करण्याचा मान आहे ही औसेकर गुरु गादीच्या शिष्यांसाठी गौरवास्पद आहे.

दिनांक ११ फेब्रुवारी पहाटेच सद्गुरु वीरनाथ मल्लनाथ महाराज संस्थान ची पालखी मोजक्या वारकऱ्यासह परतीच्या प्रवासासाठी औशाकडे परतते व दिनांक १८ फेब्रुवारी रोजी सद्गुरु दास वीरनाथ महाराज यांच्या उत्सवाची स्थापना व गोपाळकाला होऊन याच दिवशी दुपारी एक वाजता दहीहंडी काला माघ वारी सोहळ्याची सांगता होते.

या माघवारीत सर्व वारकरी सदभक्तांनी मोठ्या संख्येने श्रद्धेने नाम संकीर्तन पायी पंढरी वारी करण्याचे पुण्य प्राप्त करून घेण्यासाठी यावे पंढरीनाथ तुम्हाला ही वारी घडवतील असे आवाहन ह भ प श्री श्रीरंग गहिनीनाथ महाराज औसेकर व ह भ प श्री ज्ञानराज महाराज औसेकर यांनी केले आहे.

## थोडक्यात...

### महिलेच्या गळ्यातील मणीमंगळसूत्र लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : गड्डा यात्रेला सहपरिवारासोबत फिरण्यासाठी आलेल्या महिलेच्या गळ्यातील ७५ हजार रुपये किमतीचे मनी मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २६ जानेवारी रोजी सायंकाळी पावणे आठ वाजण्याच्या दरम्यान होम मैदान येथे घडली.याप्रकरणी गीता नवनाथ चव्हाण (वय-३०, रा. नेहरूनगर, विजापूर रोड) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोह. सरतापे हे करीत आहेत.

### हैदराबाद रस्त्यावर अपघात प्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) हैदराबाद रस्त्यावरील अपघात प्रकरणी आयशर ट्रक क्रमांक ओडी.०२.सी.झेड.५४९० यातील चालकाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याप्रकरणी पोलीस हवालदार नवले नेमणूक एमआयडीसी पोलीस ठाणे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.ही घटना २४ जानेवारी रोजी हैदराबाद रोड कडून येणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग सोलापूर येथे घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, वरील आयशर वाहन क्रमांकाच्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने नो पार्किंग ठिकाणी उभा केल्याने पाठीमागून घेणाऱ्या दुचाकी क्रमांक एम.एच.१३.ईएक्स.५०६८ यातील चालक सिद्धार्थ सोनकांबळे (वय-३२) यांची आयशर वाहन बरोबर धडक होऊन गंभीर जखमी करण्यास कारणीभूत झाला आहे. तसेच जखमीस उपचारास दाखल न करता दुचाकीचे नुकसान करून केले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मुजावर हे करीत आहेत.

# नाट्यलेखक यशवंत माणके लिखित/दिग्दर्शीत मुक्तांगण या दोन अंकी नाटकाचा ६ वा प्रयोग दादरच्या छ.शिवाजी महाराज नाट्यगृहात

### दुबल्या आई – बापाची व्यथा व्यक्त करणारे हृदयस्पर्शी नाटक




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : गेली अनेक वर्षे नाट्यक्षेत्रात आपलं आयुष्य वेचत नाट्यरसिक व रंगभूमीची सेवा करणारे गुहागर तालुक्यातील भूमिपुत्र सुप्रसिद्ध नाटककार/नाट्य कलावंत यशवंत माणके लिखित/दिग्दर्शीत असणारा एक नवा विषय रंगभूमीवर आणला आहे.रविवार दि.९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.३० वा. वृद्धाश्रमवर आधारित मुक्तांगण ह्या दोन अंकी नाटकाचा सहावा प्रयोग छत्रपती शिवाजी महाराज मंदिर,दादर ( प. ) येथे होणार आहे.रसिक मायबाप प्रेक्षकांना नाटक नव्हे तर दुबळ्या आईबापाची व्यथा पहायला या असे प्रतिपादन नाट्यलेखक यशवंत माणके केले आहे.तीन पिढ्या एकत्रित बसून पुन्हा पुन्हा बघावे असे एकमेव नाटक मुक्तांगण मुंबईकरांसाठी ही सुवर्णसंधी आहे, वृद्धाश्रमातील बोलक्या व्यथा प्रत्यक्ष पहा.अशी नाट्यकलाकृती पाहण्यासाठी मोठया संख्येने या व कलाकारांना प्रोत्साहित करा व अधिक माहितीसाठी / तिकीटसाठी – ९८१९८७५६४८,९८९२४०८८५४ सदर भ्रमणध्वनी वरती संपर्क करावा असे संयोजकांतर्फे आ-वाहन करण्यात आले आहे.

# सिन्नर–जनता विद्यालय कोमलवाडी विद्यालयात प्रजासत्ताक दिन व सांस्कृतिक महोत्सव संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोमलवाडी/प्रतिनीधी : मराठा विद्या प्रसारक समाजाचे जनता विद्यालय कोमलवाडी या शाळेत ७६ प्रजासत्ताक दिन व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला होता.



यावेळी राष्ट्रीय ध्वजाचे ध्वज-ारोहण भारतीय सैन्य दलातील जवान गणेश बोराडे हस्ते करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक अमोल नाईक असे म्हणाले की, या सांस्कृतिक कार्यक्रमातून मुलांना त्यांचा कलागुणांना चांगल्या प्रकारे वाव मिळतो असे त्यांनी आपल्या प्रस्ताविकातून व्यक्त केले.

त्या नंतर सांस्कृतिक कार्यक्रम ाला गणेश वंदना गीताने कार्यक्रम ाला सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी अप्रतिम नृत्य सादर केले.

जन्म बाईचा खूप बाईचा, हिंदी रिमिक्स, मराठी रिमिक्स, देशभक्तीपर, येळकोट येळकोट- देवाचा, सा-क्षरता गीत, चंद्रा (लावणी नृत्य ) महाराष्ट्रातील सण परंपरा आदी नृत्य कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. काठी न घोंगड घेऊ द्या की या गाण्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाकरिता पालकांनी विद्यार्थ्यांना बक्षीसांचा वर्षाव केला. व उपस्थित पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच या संपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम ाचे सूत्र संचालन मनीषा गोरा-डे – वारुंगसे यांनी केले. या कार्यक्रमाकरिता स्कूल कमिटी अध्यक्ष शरद भाऊ घुले तसेच शालेय समिती सदस्य, गाव-ातील सन्माननीय ग्रामस्थ, व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अमोल नाईक, सचिन गिते,केशव वळवी, बाजीराव ढोमसे, सौरभ कम ानकर, चित्रा बाजारे, ज्योती जोंधळे, ऋतुजा वाघ, सागर बस्ते , सौरभ गांडुळे, शरद टेमगर आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. व कार्यक्रमाचे आभार शितल रायते यांनी मानले.

# पडघा येथे मुक्काम पोस्ट पडघे पुस्तकाचे प्रकाशन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे मुक्काम पोस्ट पडघे पुस्तकाचे प्रकाशन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

पडघे गावाच्या जडणघडणीत विशेष योगदान देणाऱ्या व्यक्तीच्यां जिवनावर, विवीध समाज व त्यांचे व्यवसाय, गावातील पारंपारिक उत्सव, भौगोलिक स्थिती, पडघा आठवडा बाजार, सार्वजनिक विहीरी, गावाचा पूर्व इतिहासावर प्रकाश टाकणारे मुक्काम पोस्ट पडघे हे पुस्तक पडघ्यातील महेश वैद्य, दिनेश गंधे, अशोक शेरेकर यांनी विविध माहीती संकलीत करून पुस्तक तयार केले असुन त्यांचे प्रकाशन शुक्रवारी विठ्ठल रुक्मिणी मंदीर पटांगणात करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सॅटर्डे ग्लोबल ट्रस्टचे अध्यक्ष अशोक दुगाडे, प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार महेश म्हात्रे, तर वक्ते म्हणून श्रीराम सिधये महाराष्ट्र टाईम्स माजी सहसंपादक उपस्थित होते. उप-स्थित मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. यावेळी पडघ्यातील बाहेरगावी जाऊन स्थाईक झा-लेले व्यावसायिक भरत ठक्कर, विपुल ठक्कर, उद्योजक रामदास नायक, रवींद्र पालवी, बांधकाम व्यावसायिक भागवत दलाल, इतिहास संशोधक लेखक बंडु साठे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मजुर फेडरेशनचे




माजी अध्यक्ष पंडीत पाटील, रविंद्र कराडकर, भाजयुमो माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत गायकर माजी सरपंच अमोल बिडवी, प्रभावती जाधव, दत्तात्रेय पाटोळे, शैलेश बिडवी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारीका पारधी, तृप्ती गंधे यांनी केले.

**एसटी महामंडळाने तिकीटाचे दर वाढवले** **भाडेवाढ रद्द करण्यासाठी ठाकरे गट आक्रमक**

# आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात मेहकर येथे तीव्र आंदोलन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : एसटी महामंडळाने तिकिटाचे दर वाढवल्याने नागरिकांना मोठी झळ बसणार आहे . भाडेवाढ रद्द करण्यासाठी मेहकर आग-ारात एसटी भाडेवाढ च्या निर्णया विरोधात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार सिद्धार्थ खरात व उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे यांच्या प्रमुख नेतृत्वात बस स्थानक परिसरात निषेध आंदोलन करुन सरकार विरुद्ध घोषणा देत निषेध केला. एसटी भाडेवाडीच्या विरोधात ठाकरे गट आक्रमक झाला आहे .एकीकडे लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिले जातात .तर दुसरीकडे एसटी बसची भाडे वाढ करून सर्वसामान्य जनतेच्या खि-शाला कात्री लावण्याचे काम सरकार सेकरत असल्याचा आरोप सेनेच्या कार्यकर्त्यांनी केला

२३ जानेवारीला परिवहन प्राधिकरणाची बैठक पार पडली असून या बैठकीत एसटी भाडेवाढीचा निर्णय झाला आहे. अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली एसटी दरवाढीबाबत १४.९५ टक्के इतकी वाढ झाली आहे.जिल्ह्यात एसटी भाडेवाढीच्या निषेधार्थ उबाठा गटाकडून संपूर्ण महाराष्ट्रात चक्का जाम आंदोलन करण्यात येत आहे. तर आमदार सिद्धार्थ खरात यांच्या प्रम ुख नेतृत्वात बस स्थानक परिसरात निषेध आंदोलन केले आहे. दरम्यान, एसटी भाडेवाडीच्या विरोधात ठाकरे



गट आक्रमक झाला असून ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांनी बास्थानाकासम ोर आंदोलन केले.एकीकडे लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिले जातात. तर दुसरीकडे एसटी बसेसचे भाडेवाढ करून सर्वसामान्य जनतेच्या खिशा-ला कात्री लावण्याचे काम हे सरकार करत आहे असा आरोप आमदार सिद्धार्थ खरात व शिवसैनिकांनी केले आहे. शासकीय विश्रामगृह ते मेहकर आगार पर्यंत शेकडो कार्यकर्त्यांनी मोटार सायकल रॅली काढून आग-ार व्यवस्थापक यांना निवेदन दिले त्याच बरोबर आठ दिवसात एसटी ची भाडेवाढ रद्द करावी अन्यथा या पुढं देखील दर वाढी विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी दिला आहे.या वेळी उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, दिपक मापारी, रमेश बापू मापारी, किसन पाटिल, नारायण बळी, स्वप्नील हाडे, गोपाल खोतकर, ऋषि पागोरे,मेहकर शहर अध्यक्ष किशोर भाऊ गारोळे,ड आकाश घोडे, गजानन जाधव, विजय मोरे, योगेश कंकाळ, रवि गिते,जीवन घायाळ, ऋषिकेश जगताप,परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत मादनकर, समाधान ठाकरे, गजानन राठोड, महादेव उर्फ बाळूभाऊ पारवे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### आ. खरात यांचा चक्का जाम आंदोलनाचा इशारा

**एसटी ची भाडेवाढ करण्याचा सरकार निर्णय हा सर्व सामान्य जनतेच्या खिशाला परवडनारा नसून सुध्दा हा चुकीचा निर्णय घेण्यात आलाय. एसटीची ही भाडेवाढ अतिशय अन्यायकारक आहे. एसटी प्रवाशांच्या व्यथा जुलमी सरकार काय माहित. एसटीही शहरी आणि ग्रामीण भागात प्रवासाचं मुख्य साधन आहे. त्यातच जर १५ टक्के वाढ होत असेल तर त्याला विरोध करण्याची भूमिका शिवसेनेनं घेतली आहे जर भाडेवाढ रद्द झाली नाही तर बसस्थानकाच्या रस्त्यावरून मुख्य रस्त्यावर बसू, चक्काजाम करू असा इशारा ही आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिला आहे आजचे हे आंदोलन वादळापूर्वीची शांतता आहे.जर भाडेवाढ झाली नाही तर सर्व रस्ते बंद करू चक्काजाम करू शिवसेना स्टाईलने आंदोलन करून सरकारला वेठीस धरू असा सूचक ईशाराही आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिला आहे.**